प्रकरण १

# मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची साधने

## पूर्वमध्ययुगीन (सुलतानशाही) भारताच्या इतिहासाची साधने

प्राचीन भारतीय विद्वानांना इतिहास लिखाणात विशेष आस्था नव्हती. त्यांच्या विचार व लिखाणाचा भर धार्मिक, आध्यात्मिक आणि तत्त्वज्ञानविषयक बाबींवर होता. त्यामुळे जे काही भारतीय इतिहास लेखन आढळते त्याला इस्लामी वारसा लाभला आहे हे सत्य नाकारता येत नाही. इस्लामधर्मीय राज्यकर्त्यांच्या दरबारात घडणाऱ्या दैनंदिन कामकाजाची व राजकीय चढउतारांची बारीकसारीक नोंद ठेवणाऱ्या दरबारी लेखनिकांना (बखरकार) इतिहासाची सूक्ष्म जाण होती. मुसलमान राज्यकर्त्यांच्या दार-उल्-हरब (मूर्तिपूजक किंवा हिंदूजगत) चे दार-उल्-इस्लाम (इस्लाममय जगत) मध्ये परिवर्तन करण्यासाठी काढलेल्या लष्करी मोहिमांचा त्यांना अभिमान होता व या मोहिमाद्वारे वाढणाऱ्या इस्लामच्या वैभवाची नोंद ठेवणे हे ते स्वत:चे पवित्र कर्तव्य समजत. शिवाय ते भौतिकवादी असल्याने पारलौकिक जगापेक्षा इहलोकाविषयी व इहलोकातील भूत व वर्तमानकालीन घटनांविषयी त्यांना जास्त आत्मीयता होती.

दरबारी लेखनिक दरबारातील सूक्ष्मातील सूक्ष्म घटनांची जी नोंद ठेवत त्यात एक शिस्त असे. यात घटनांच्या कालानुक्रमावर काटेकोर भर दिला जाई. त्यांच्या लिखाणातील अतिशयोक्त वर्णनाचा भाग सोडला तर या सर्व लिखाणातून त्यांचे सूक्ष्म निरीक्षण, वस्तुस्थितीचे आकलन, जीवनाच्या सर्व अंगांचा समाचार घेण्याची धडपड इस्लामच्या व राज्यकर्त्यांच्या वैभवाचे गोडवे गात असतानाच स्वत:च्या बुद्धिचातुर्य आणि लेखनकौशल्याचे प्रदर्शन इ. बाबी दिसून येतात. इस्लामच्या राजवटीत काही सुसंस्कृत शासक व सरदारांनी आत्मचरित्रे व स्वत:च्या रोजनिशा लिहिल्या आहेत. त्यामुळे इतिहास लेखनकला दिल्ली सुलतानशाहीच्या काळात विशेषतत्वाने बहरली.

इस्लाम राजवटींविषयीचे सुरुवातीचे लिखाण हे अरबी भाषेत असले तरी कालांतराने इस्लामचा इराणमध्ये प्रवेश झाल्याने बहुतेक लिखाण हे पर्शियन (इराणची भाषा) भाषेत झाले. तुरळक लिखाण तुर्की भाषेतही आहे. आज हे सर्व लिखाण इंग्रजी व काही प्रमाणात भारतीय भाषांमधून उपलब्ध झाल्याने मध्ययुगीन भारताच्या भारतीय अभ्यासकांची फार मोठी सोय झाली आहे.

पूर्वमध्ययुगीन दरबारी लेखनिक हे प्रामुख्याने तुर्की व अफगाण वंशाचे असून त्यांना राज्यकर्त्यांच्या केवळ लष्करी मोहिमा व साम्राज्यविस्तारातच रस होता. त्यांच्या लिखाणात सामान्य माणसाला स्थान नसल्याने तत्कालीन भारताच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे चित्रण त्यांच्या लिखाणात अभावानेच आढळते. शिवाय तत्कालीन शिक्षणपद्धती

Scanned with CamScanner

ज्ञानाचा प्रत्येक स्रोत पवित्र असल्याने हे सर्व लेखक ज्ञानाचा प्रत्येक स्रोत पवित्र
ही धर्म व तत्त्वज्ञानावर आधारित असल्याने हे सर्व लेखक ज्ञानाचा प्रत्येक स्रोत पवित्र कुराण किंवा पैगंबरात शोधण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळे शास्त्रीय दृष्टिकोनाचा अभाव असलेले हे लिखाण स्वीकारण्यापूर्वी आधुनिक कसोट्यांवर त्यांची ऐतिहासिक सत्यासत्यता पडताळून पाहणे अगत्याचे ठरते. गद्य व पद्य शैलीतील हे लिखाण व जोडीला नाणी, पुरातन वस्तूंचे अवशेष इ.च्या साहाय्याने अभ्यासकाला मध्ययुगीन भारताच्या इतिहासाच्या अंतरंगात शिरता येते.

भारताच्या इतिहासाचे निरनिराळ्या राजकीय वंशांच्या राजवटीनुसार तीन कालखंड पडतात. अ) इस्लामच्या आक्रमणापूर्वीच्या कालखंडाला प्राचीन ब) इस्लाम राजवटीच्या कालखंडाला मध्ययुगीन तर क) ब्रिटिश राजवटीच्या कालखंडाला आधुनिक कालखंड म्हणतात. मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचेही पूर्व मध्ययुग (इ. स. १००० ते १५२६) आणि मध्ययुग (इ. स. १५२६ ते १८५७) असे दोन कालखंड पडतात.

इतिहास हा नदीच्या प्रवाहासारखा असतो. त्यात नित्य नवीन शोधांची भर पडत असते. त्यामुळे काल जाणवलेले सत्य आज सत्य असेलच नाही. आजच्या वैज्ञानिक युगात इतिहास संशोधनातील नवनवीन तंत्रे विकसित होत असताना आणि कालानुरूप घटनांचे संदर्भ व अर्थ बदलत असताना ऐतिहासिक सत्याच्या जास्तीत जास्त जवळ जाण्याचा प्रयत्न इतिहासाचा अभ्यासक करीत असतो.

**पूर्वमध्ययुगीन (इ. स.१००० ते १५२६) इतिहासाची साधने** - समकालीन लेखकांनी यावर भरपूर लिखाण केले आहे. त्यापैकी काही महत्त्वाच्या नोंदींचा येथे परामर्ष घेणे उचित ठरेल.

**चचनामा** - इ. स. ७११-७१२ च्या सुमारास भारतावरील अरबांच्या आक्रमणसमयी सिंध प्रांतात राज्य करणाऱ्या राजघराण्यावर प्रकाश टाकणारा 'चचनामा' हा उत्कृष्ट ग्रंथ होय. हा ग्रंथ अरबी भाषेत असून ग्रंथलेखकाचे नाव गुलदस्त्यात आहे. ग्रंथ लेखक हा महंमद बिन कासिमच्या सैन्याबरोबर भारतात आला असावा. सिंध प्रांताचा शेवटचा शूद्रवंशीय शासक रायसाहसी द्वितीयच्या मृत्यूनंतर त्याचा ब्राह्मण मंत्री 'चच'(शिलादित्यचा पुत्र) याने सिंधची गादी बळकावली. स्वत:चे स्थान मजबूत करण्यासाठी चचने रायसाहसींची विधवा राणी शुभनदेवीशी विवाह केला. चचचा मुलगा दाहीर इ. स. ७०८ मध्ये सिंधच्या गादीवर बसला. याच्याच काळात अरबांनी सिंधवर स्वारी केली. त्यात दाहीर त्यांच्या संपूर्ण कुटुंबासहीत मारला गेला. चच याने नव्याने स्थापन केलेल्या राजघराण्याचा संक्षिप्त वृत्तांत या ग्रंथात असून चच या संस्थापकाच्या नावावरून या ग्रंथाला 'चचनामा' नाव देण्यात आले.

**अल्बरूनी (इ.स.९७२-१०४८)** - भारतीय इतिहासावर प्रकाश टाकणारा पहिला प्रगल्भ मुस्लिम इतिहासकार अल्बरूनी म्हणजे ११ व्या शतकात बोटांवर मोजण्याइतक्या होऊन गेलेल्या बुद्धिवाद्यांपैकी एक होय. इराणी वंशात ख्वारिझम (तुर्कस्थान) येथे



जन्मलेला अल्बरूनी म्हणजे चालता-बोलता ज्ञानकोश होता. त्याच्या पोतडीत विज्ञान, साहित्य, धर्म, तत्त्वज्ञान, गणित, वैद्यकशास्त्र, खगोलशास्त्र, जोतिषशास्त्र, भूगोल इ. विषयांचा खजिना ओतप्रोत भरला होता. काही दिवस तो ख्वारिझमच्या मामुनी वंशाच्या शहाचा राजकीय सल्लागार होता. इ.स. १०१७ मध्ये गझनीच्या महंमदाने ख्वारिझमच्या शहाचा पराभव करून हजारो कैद्यांबरोबर अल्बरूनीला कैद करून गझनीला नेले. परंतु त्याची विद्वत्ता पाहून त्याला लवकरच मुक्त केले. पुढे इ. स. १०१८-१९ मध्ये तो महंमद गझनीच्या सैन्याबरोबर भारतात आला व त्याने बरीच वर्षे भारतात वास्तव्य केले. त्याने भारतात सर्वदूर प्रवास करून भारतीय भाषा, हिंदू धर्म व तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला व अरबी भाषेत भारतावर प्रकाश टाकणारा "तारीख-उल्-हिंद" हा अप्रतिम ग्रंथ लिहिला. पुढे या ग्रंथाचे पर्शियन भाषेत भाषांतर झाले. महंमद गझनीच्या आक्रमण समयीच्या भारताच्या सामाजिक, धार्मिक परिस्थितीवर सखोल प्रकाश टाकणाऱ्या या ग्रंथात भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरांचा व वैज्ञानिक आणि साहित्यिक योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख आहे. या ग्रंथात त्याने भारतीयांच्या व्यक्तिमत्त्वातील दुबळ्या बाजूंचाही विचार मांडला असून त्यांची सामाजिक, राजकीय व्यवस्था ही त्यांच्या इस्लामी आक्रमकांविरुद्धच्या संघर्षातील पराभवाचे मूळ कारण सांगितले आहे. अल्बरूनीने त्याच्या या ग्रंथात संस्कृत साहित्याचा भरपूर वापर केला. वयाच्या ७७ व्या वर्षी गझनी येथे त्याचा मृत्यू झाला.

**उत् बी** - पर्शियातील उत् बा वंशातील उत् बी हा महंमद गझनीच्या खाजगीकडील नोकरदारांपैकी एक होय. त्याने "तारीख-इ-यामिनी" (किताब-उल्-यामिनी) हा अरबी भाषेत उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. या ग्रंथात सबक्तगिनच्या नेतृत्वाखाली झालेल्या गझनी साम्राज्याच्या उदयापासून ते इ. स. १०२० पर्यंतच्या महंमद गझनीच्या लष्करी मोहिमांचा सांगोपांग आढावा घेण्यात आला आहे. उत् बी हा भारतीय भाषा व भूगोलाविषयी अनभिज्ञ असल्याने त्याच्या महंमद गझनीच्या लष्करी मोहिमांच्या तपशिलात अनेक चुका आहेत. तो दरबारी बखरकार किंवा इतिहासकार नसल्याने घटना नोंदविताना त्याचा तारखा व कालानुक्रमाबाबत गोंधळ उडताना दिसतो. तो कट्टर सुन्नी असल्याने मूर्तिपूजकांच्या देशात इस्लामची पताका फडकावणाऱ्या गझनीच्या महंमदाची तो वारेमाप स्तुती करतो. या ग्रंथात अनेक ढोबळ चुका असूनही तत्कालीन व मोगलकालीन इतिहासकार या ग्रंथाचा संदर्भासाठी वापर करताना दिसतात.

**अबुल फझल बैहाकी** (इ. स. ९९६-१०७७) - महंमद गझनीचा वारसदार सुलतान मसूदच्या चाकरीत असलेल्या अबुल फझल बैहाकीने गझनीच्या शासकांचा इ. स. १०५९ पर्यंतचा सविस्तर इतिहास १० खंडात "तारीख-इ-बैहाकी" या नावाने लिहीला. "तारीख-उस्-सबक्तगीन", "ताजुल-फुतुह" (सुलतान महंमद गझनीचा इतिहास) "तारीख-इ-मसुदी" (सुलतान मसूदचा इतिहास) इ. त्याच्या खंडाची नावे असून १०

Scanned with CamScanner

खंडांपैकी काही खंड आज उपलब्ध नाहीत. मोगलकालीन इतिहासकारांनी या ग्रंथाचा इतिहास लिहिण्यासाठी भरपूर वापर केला. त्याने लिहिलेला सबक्तगिनचा इतिहास विश्वसनीय नाही. परंतु त्याचा शासक सुलतान मसूदवरील त्याचे लिखाण अतिशय मौलिक आहे. सुलतान मसूदने घोर प्रांतात काढलेल्या लष्करी मोहिमेचा वृत्तांत देताना त्या प्रदेशातील सामाजिक व राजकीय परिस्थितीवर या ग्रंथात चांगला प्रकाश टाकण्यात आला आहे. व्याकरणातील चुका, वाक्यांची तुटक रचना, नेमक्या शब्दांच्या प्रयोगाचा अभाव आणि कालानुक्रमाकडे दुर्लक्ष हे या ग्रंथाचे दोष मान्य करूनही त्याचे ऐतिहासिक मोल नाकारता येत नाही.

**हसन निझामी** - या लेखकाचा "ताजुल-मासिर" हा ग्रंथ प्रामुख्याने कुतुबुद्दीन ऐबकच्या इतिहासावर प्रकाश टाकतो. निशापूर येथील उच्चभ्रू कुळात जन्मलेला हसन हा प्रथम खुरासान येथे आला. तेथून गझनी व नंतर दिल्ली येथे येऊन त्याने महंमद घोरीच्या उत्तर भारत प्रांताचा राज्यपाल कुतुबुद्दीन ऐबकच्या पदरी चाकरी पत्करली. कुतुबद्दीनच्या आदेशावरूनच त्याने इ. स. १२०५ मध्ये वरील ग्रंथनिर्मितीला सुरुवात केली. महंमद घोरीच्या मृत्यूनंतर कुतुबुद्दीन उत्तर भारताचा स्वतंत्र शासक झाल्याने साहजिकच हसनच्या सामाजिक दर्जात वाढ होऊन त्याच्या ग्रंथनिर्मिती कार्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली. दिल्ली व अजमेरचा शासक पृथ्वीराज चौहानकडून पहिल्या तराई युद्धात पराभूत झालेल्या आणि जखमी वाघाप्रमाणे उलटून पृथ्वीराजाचा सपशेल पराभव करणाऱ्या तराईच्या द्वितीय युद्धापासून म्हणजे इ. स. ११९१-९२ पासून या ग्रंथाची सुरुवात होते. महंमद घोरीच्या पराक्रमाचे गोडवे गायल्यानंतर या ग्रंथात इ. स. ११९२ ते १२०६ या कालखंडातील उत्तर भारताचा राज्यपाल या नात्याने कुतुबुद्दीन ऐबकने गाजविलेल्या लष्करी मोहिमांचा आढावा घेण्यात आला आहे. स्वतंत्र शासक (इ. स. १२०६ ते १२१०) या नात्याने कुतुबुद्दीनवर एकच प्रकरण असून इ. स. १२१७ पर्यंतच्या सुलतान अल्तमशच्या कारकीर्दीची या ग्रंथात चर्चा करण्यात आली आहे. भारतातील इस्लामच्या राजवटीची माहिती देणारा हा ग्रंथ गद्यात्मक व पद्यात्मक असून त्यात अरबी व पर्शियन भाषेचे सुरेख मिश्रण आहे. या ग्रंथात इतिहास व कल्पित कथांचाही सुंदर मिलाप आढळतो. काहीसा पंचतंत्राच्या शैलीने लिहिण्यात हा ग्रंथ मध्ययुगीन विद्वानांच्या वर्तुळात अतिशय लोकप्रिय होता.

**मिन्हाजुस सिराज** - गझनीच्या महंमदाशी नाते सांगणारा व मध्य अशियातील उच्चभ्रू कुटुंबात जन्मलेला मिन्हाजुस इस्लामी तत्त्वज्ञान व कायद्याचा तज्ज्ञ होता. इ. स. १२२७ मध्ये सिंध प्रांतात उच्छ येथे एका शाळेचा मुख्याध्यापक म्हणून स्वत:च्या कारकीर्दीला सुरुवात केल्यानंतर त्याने इ. स. १२२८ मध्ये अल्तमशच्या काळात दिल्लीचा मुख्य काझी म्हणून कार्यभार सांभाळला. सुलतान नासिरूद्दीन महंमद (१२४६-१२६६) आणि त्याचा मलिक नायब बल्बनचा तो विशेष कृपापात्र होता. "तबकत-



इ-नासिरी" या त्याच्या २३ लहान खंड असलेल्या ग्रंथात इस्लम जगताचा सविस्तर आढावा घेतला आहे. महंमद पैगंबरापूर्वी होऊन गेलेल्या प्रेषितांपासून ते इस्लामच्या जन्मापर्यंतच्या घटनांचा परामर्ष पहिल्या खंडात घेण्यात आला आहे. त्याच्या खंडातून खलिफा व देशोदेशींच्या मुसलमान राज्यकर्त्यांची माहिती मिळते. गझनी, घोरी इ. मध्य अशियातील राज्यघराण्यांची माहिती देणारा हा उपयुक्त ग्रंथ आहे. यात चंगेझखान या मंगोल शासकाच्या मध्य आशिया व भारतावरील स्वाऱ्यांची हकीकत असून इ. स. १२५९ पर्यंतच्या मंगोल शासकांचा इतिहास सांगणारा हा ग्रंथ आहे. अतिशय साध्या, सरळ व ओघवत्या भाषेतील हा संक्षिप्त ग्रंथ घटनांचे नेमके वर्णन करतो. त्यात पाल्हाळीकपणा नाही. पूर्वमध्ययुगीन काळात हा ग्रंथ अतिशय लोकप्रिय होता, परंतु ग्रंथाच्या २३ व्या खंडात मिन्हाजुसने मध्य आशियात मंगोलांनी मुस्लिमांच्या केलेल्या लांडगेतोडीचे जे वर्णन केले आहे त्यामुळे मोगल बादशहांनी या ग्रंथाच्या प्रसाराला विशेष उत्तेजन दिले नाही.

**अमीर खुस्रो (इ. स. १२५२-१३२५)** - मूलत: कवी व संगीतकार असलेला अमीर खुस्रो बल्बन ते गियासुद्दिन तुघलक या सुलतानांच्या दरबारी कवी होता. तो "तुती-ए-हिंद" (भारतीय पोपट) या नावाने लोकप्रिय होता. त्याने "तुघलक नामा", "देवल रानी खिज्र खानी" इ. इतिहासावरील सहा पुस्तके लिहिली. तसेच पर्शियन व हिंदीत सुमारे चार लक्ष काव्य पंक्ती, साहित्यावर ९२ पुस्तके, पाच दिवाण, (काव्यसंग्रह) बारा कादंबऱ्या, शेख निझामुद्दीन या सुफी संताच्या विचारांचे संकलन इ. प्रचंड ग्रंथनिर्मिती केली. किराण-उस्-सादिन या खुस्रोच्या ऐतिहासिक ग्रंथातून सुलतान कैकुबाद व त्याचे वडील आणि बंगालचे राज्यपाल बुधाखान यांच्या अयोध्याभेटीतील वार्तालापाची विश्वसनीय माहिती मिळते. या भेटीचा खुस्रो हा प्रत्यक्ष साक्षीदार होता. त्याच्या या ग्रंथातून सुलतान कैकुबादच्या लष्करी मोहिमा, त्यांच्या दरबाराचो तसेच तत्कालीन भारताच्या राजकीय परिस्थितीची माहिती मिळते. त्याच्या "तारीख-इ-इलाही" ग्रंथातून अल्लाउद्दीन खिलजीच्या लष्करी व इतर उपक्रमांची विस्तृत्व माहितो मिळते. "देवल रानी खिज्र खानी" या त्यांच्या काव्यग्रंथातून गुजरातचा शासक राणा कर्णची कन्या देवलराणी व सुलतान अल्लाउद्दीन खिलजीचा मुलगा खिज्रखान यांची प्रणयगाथा आपल्याला समजते. स्वत:च्या ग्रंथात हिंदी शब्दांचा भरपूर वापर करणारा तो पहिला मुसलमान कवी होय.

**झियाउद्दीन बर्नी** - तुर्की वंशातील खानदानी घराण्यात इ. स. १२८५ मध्ये जन्मलेला बर्नी हा पूर्वमध्ययुगीन काळातील सर्वश्रेष्ठ इतिहासकार गणला जातो. दिल्ली येथे अत्यंत श्रीमंतीत व सुसंस्कृत वातावरणात त्याचे बालपण गेले. पुढे त्याने महंमद तुघलकाच्या दरबारात १७ वर्षे चाकरी केली. महंमदाला बर्नीच्या विद्वत्तेविषयी नितांत आदर होता. बर्नी हा अमीर खुस्रोच्या घनिष्ठ मित्रांपैकी एक असून त्याला स्वत:च्या

Scanned with CamScanner

राजकीय व सामाजिक दर्जाचा रास्त अभिमान होता. महंमद तुघलकाच्या मृत्यूनंतर झालेल्या सत्तासंघर्षात बर्नीला कारावास भोगावा लागला. त्याचे सर्व वैभव गेले. तो कफल्लक झाला आणि अत्यंत दरिद्री अवस्थेत शेख निझामुद्दीन औलिया या सुफी संताच्या दर्ग्याच्या परिसरात मृत्यू पावला.

''तारीख-इ-फिरोजशाही'' हा बर्नीचा सुप्रसिद्ध ग्रंथ. यात इ. स. १२५९ ते १३५९ या कालखंडातील बल्बन ते फिरोजशहा तुघलकच्या कारकीर्दीच्या सहाव्या वर्षापर्यंतचा म्हणजे दिल्ली सुलतानशाहीतील ९ सुलतानांच्या इतिहासाचा आढावा घेण्यात आला आहे. महंमद तुघलकाविषयीचे बर्नीचे लिखाण पक्षपात करणारे असून तो ऐतिहासिक सत्याचा जाणीवपूर्वक अपलाप करताना दिसतो. तर फिरोजशहा तुघलकविषयी दडपणाखाली लिहिताना तो सुलतानाची अवाजवी स्तुती करताना दिसतो. बर्नीच्या पोतडीत ऐतिहासिक घटनांचा खजिना दडला होता. परंतु त्याचे लिखाण वर्णनात्मक नसून प्रामुख्याने समीक्षात्मक व विश्लेषणात्मक आहे. राजकीय व प्रशासकीय घटनांची शास्त्रीय दृष्टीने उकल करीत असताना तो तत्कालिन राज्यकर्ते व परिस्थितीवर नेमका प्रकाश टाकतो. त्यामुळे बर्नीला टाळून दिल्लीच्या सुलतानशाहीचा अभ्यास करता येणे शक्य नाही.

**फिरोज तुघलकचे आत्मचरित्र** - ''फुतुहत-इ-फिरोजशाही'' हे फिरोजशहाचे ३२ पानी आत्मचरित्र. यात त्याने त्याच्या लष्करी मोहिमांचे व त्यातील यशापयशाचे प्रामाणिक वर्णन केले आहे. यातच त्याने सुलतानाची कर्तव्ये व मानवीय दृष्टिकोनातून त्यांची अंमलबजावणी याचीही चर्चा केली आहे.

**शम्स-इ-सिराज अफिफ** - इ. स. १३५४ मध्ये जन्मलेल्या अफिफचा सुलतान फिरोज तुघलकशी दाट स्नेह होता. त्याची व सुलतानाची निरनिराळ्या विषयांवर विद्वत्तापूर्ण चर्चा चाले. तो सुलतानाबरोबर शिकारीलाही जात असे. परंतु त्याने सुलतानाची कधीही चाकरी केली नाही. त्याने गियासुद्दीन, महंमद व फिरोजशहा या तीन तुघलकवंशीय सुलतानांवर तीन पुस्तके लिहिली ज्यात त्यांचा जीवनवृतांत, लष्करी मोहिमा व प्रशासकीय उपलब्धींचे वर्णन येते. परंतु त्यापैकी केवळ तारीख-इ-फिरोजशाहीच आज अस्तित्वात असून इतर दोन ग्रंथ नष्ट किंवा गहाळ झालेत. उपलब्ध ग्रंथ हा सर्वस्वी फिरोजशहाच्या कामगिरीचा आढावा घेणारा असून फिरोजशहावरील तो सर्वोत्कृष्ट ग्रंथ मानला जातो. नव्वद प्रकरणे असलेल्या ग्रंथाच्या पानापानांतून अफिफची इतिहासाविषयीची प्रामाणिकता स्पष्ट दिसून येते. या ग्रंथात फिरोज तुघलकाच्या राजकीय व लष्करी हालचालींबरोबरच त्याच्या प्रशासकीय कामगिरीचे व प्रजेच्या हितासाठी केलेल्या कार्याचेही योग्य मूल्यमापन करण्यात आले आहे. या ग्रंथामुळेच शेरशहा सुरी व सम्राट अकबर यांनी जनहिताच्या कामाबाबत फिरोजशहाचा वारसा पुढे चालविला हे आपल्याला कळते.

**अमीर तैमूरचे आत्मचरित्र (इ. स. १३३४ -१४०५)** - इ.स. १३९८-९९ मध्ये एखाद्या टोळधाडीप्रमाणे दिल्लीवर तुटून पडणाऱ्या तुर्की आक्रमक तैमूरलंगने



''तुझुक-इ-तैमुरी'' ऊर्फ ''मलफुझात-इ-तैमुरी'' हे मूळ तुर्कीभाषेत व पुढे पर्शियनमध्ये भाषांतरित झालेले आत्मचरित्र लिहिले. तैमूर हा प्रत्यक्ष या आत्मचरित्राचा लेखक नसला तरी त्याच्या मार्गदर्शनाखाली लिहिण्यात आलेल्या या आत्मचरित्रात तैमूरच्या रक्तपिपासू व विध्वंसक लष्करी मोहिमांचे कोणताही आडपडदा न ठेवता सरळ व साध्या भाषेत वर्णन करण्यात आले आहे.

**याह्याबिन अहमद सरहिंदी** - सरहिंदीचा ''तारीख-इ-मुबारकशाही'' हा दिल्लीच्या सय्यद घराण्याची (१४१४-१४५१) माहिती देणारा एकमेव समकालीन ग्रंथ होय. या ग्रंथाची सुरुवात घोरी घराण्याच्या उदयापासून आणि तुर्कांच्या उत्तर भारत विजयापासून होते. या ग्रंथात सय्यद घराण्यापूर्वीच्या दिल्लीच्या सुलतानांची त्रोटक माहिती मिळत असली तरी मुख्य भर सय्यद घराण्यावर देण्यात आला असून त्यातही मुबारकशहा (१४२१-१४३५) या सय्यद सुलतानाच्या कामगिरीवर प्रामुख्याने लिहिण्यात आले आहे. मध्ययुगीन लेखकांप्रमाणे याह्याही इस्लामच्या प्रत्येक यशाचे श्रेय अल्लाहला देतो. मोगलकालीन इतिहासकार निझामुद्दीन अहमद, बदायुनी, फरिश्ता इतिहासलेखनासाठी या ग्रंथाचा आधार घेताना दिसतात.

**ख्वाजा अब्दुल्ला मलिक इसामी (जन्म इ. स. १३११)** - तुर्की वंशात जन्मलेला इसामी हा १४ व्या शतकातील एक विद्वान आणि श्रेष्ठ दर्जाचा कवी होता. त्याने इ. स. १३४९-५० मध्ये लिहिलेल्या "फुतुहस-सलातीन" या भारतातील तुर्की घराण्याच्या इतिहासात गझनी ते महंमद तुघलकपर्यंतच्या घडामोडींची माहिती मिळते. तो १६ वर्षांचा असताना दौलताबाद येथे राजधानी स्थलांतराच्या निमित्ताने आला. येथे अत्यंत कष्टमय जीवन व्यतीत केल्यानंतर बहामनी राज्याचा संस्थापक अल्लाउद्दीन हसनने त्याला राजाश्रय दिला. स्वत:च्या आश्रयदात्याची मर्जी संपादन करण्यासाठी त्याने उपलब्ध साधनांच्या साहाय्याने वरील ग्रंथ उतारवयात लिहिला. दिल्लीच्या सुलतानांचा संक्षिप्त आढावा घेऊन तो हसन बहमानीच्या कामगिरीचे अतिशयोक्त काव्यमयवर्णन करतो. महंमद तुघलकाचे वर्णन तो "सर्वात शहाणा मूर्ख" म्हणून करतो.

**मीर ख्वान्द (जन्म इ. स. १४३३)** - खुरासाण शासकाचा दरबारी विद्वान हा अरब असून त्याने "रौझत-उस-सफा" (पावित्र्याचे उद्यान) हा ग्रंथ लिहिला; ज्यात मध्य आशियाचा इतिहास असून चंगेझखान, तैमूरलंग व त्यांच्या वारसांच्या कामगिरीचे त्यात वर्णन आहे.

**खोंडामीर (जन्म इ. स. १४७५)** - हिरात येथे खुरासाणचा शासक सुलतान बादुइज झमनच्या राज्यात मुख्य काझी व सद्रचे पद भूषिवणाऱ्या खोण्डामीरने सहा वर्षांच्या अथक परिश्रमानंतर "खुलासात उल् अखबार" हा इस्लाम जगतावर प्रकाश टाकणारा दर्जेदार ग्रंथ लिहिला. याशिवाय "दस्तुर उल् वुझारा" हा त्याचा ग्रंथही मौलिक आहे. "हबीबुस सियार" या ग्रंथाचे लेखन सुरू असताना तो भारतात आला. (१५२१

Scanned with CamScanner

ते १५२८) त्याने आग्रा येथे बाबरची भेट घेतली. त्याच्या विद्वत्तेने प्रभावीत होऊन बाबरने त्याला भरपूर द्रव्य दिले. गंगेच्या काठी "हबीबुस सियार" ग्रंथ पूर्ण झाला. या ग्रंथात तुघलक घराणे वगळता दिल्लीच्या उर्वरित सुलतानशाहीचा इतिहास सांगण्यात आला आहे. "खुलासात उल अखबार" या ग्रंथात मोगलांचा इ. स. १५२८ पर्यंतचा इतिहास कथन करण्यात आला आहे.

**परकीय प्रवाशांचे वर्णन -** पूर्व मध्ययुगात काही मोजक्या प्रवाशांनी भारताला भेट देऊन तत्कालीन परिस्थितीवर प्रकाश टाकला आहे.

**इब्न बतुता (१३०४ - १३७८) -** भारताला भेट देणाऱ्या परकीय प्रवाशात इब्न बतुताचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे. इस्लामचे मोरक्को निवासी अरब प्रवासी इब्न बतुताने इ. स. १३२५ मध्ये जगाच्या तत्त्वज्ञान व कायद्यात प्रवीण असलेल्या इब्न बतुताने इ. स. १३२५ मध्ये जगाच्या प्रवासाला सुरुवात केली आणि इ. स. १३३३ मध्ये तो दिल्लीला आला. महंमद तुघलकाने त्याची दिल्लीच्या काझीपदी नियुक्ती केली. इ. स. १३४२ मध्ये महंमद तुघलकाने त्याची चीनला पाठविण्यात आलेल्या राजकीय शिष्टमंडळात नेमणूक केली परंतु जहाजाला झालेल्या अपघातामुळे हे शिष्टमंडळ अर्ध्या वाटेवरूनच माघारी परतले. यानंतर इब्न बतुताने दिल्ली कायमची सोडली व काही काळ मदुराई येथे वास्तव्य केले. त्याच्या ''किताब-उर-रेहला'' या अरबी भाषेतील प्रवासवर्णनपर ग्रंथात दिल्ली व मदुराई येथील घटनांवर जास्त भर देण्यात आला आहे. या ग्रंथावरून महंमद तुघलकाचा इतिहास समजण्यास बरीच मदत होते. पर्शियन व भारतीय भाषांचे अज्ञान व ऐतिहासिक दृष्टीचा अभाव यामुळे या ग्रंथात अनेक चुका असल्या तरी एका परकीय प्रवाशाने तुघलक काळातील भारताच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीवर टाकलेला प्रकाश निश्चितच मौलिक आहे.

**अब्दूर रज्जाक -** ''मतलाउस सादिन वा मजमाउल बहरेन'' या ग्रंथाचा लेखक अब्दूर रज्जाक हा पर्शियन भाषेचा पंडित असून इ. स. १४३७ मध्ये त्याने खुरासाणच्या सुलतानाकडे चाकरी पत्करली. सुलतानाने त्याला विजयनगर येथे राजदूत म्हणून पाठविले. तेथील दरबारात तो दोन वर्षे (१४४२-४३) होता. त्याने दोन खंडात मध्य आशियाचा इतिहास लिहिला. त्यात त्याने तैमूरलंग व त्याच्या वारसांच्या युद्धमोहिमांचे तसेच विजयनगरचा दरबार, तेथील राज्यकर्त्यांचे खाजगी जीवन व दक्षिण भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचे वर्णन केले आहे. विजयनगर साम्राज्याचा इतिहास जाणून घेण्यासाठी या ग्रंथाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**मार्कोपोलो -** आधुनिक भूगोलाचा जनक असलेला मार्कोपोलो व्हेनिसचा निवासी होता. इ. स. १२७१ मध्ये तो जगाच्या प्रवासाला निघाला आणि इ. स. १२७४ मध्ये चीनचा मंगोल शासक कुबलाईखानच्या दरबारात उपस्थित झाला. परतीच्या प्रवासात त्याने भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्याने प्रवास केला. प्रवासवर्णनात त्याने भारताचा



समुद्री व्यापार व किनारपट्टीवरील व्यापार तसेच सामान्य भारतीयांची जीवनपद्धती, त्यांचा आहार, वेषभूषा, चालीरीती, श्रद्धा, परंपरा यांचे तपशील दिले आहेत.

**निकोलो कोंटी -** मार्कोपोलो नंतर सुमारे १५० वर्षानंतर व्हेनिसच्याच निकोलो कोंटीने दक्षिण भारताला भेट दिली. (१४२०) त्याच्या प्रवासवर्णनात विजयनगरचा दरबार व दक्षिण भारताच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे त्रोटक वर्णन येते.

**ड्युरेट बार्बोसा -** हा पोर्तुगीज प्रवासी इ. स. १५००-१५१६ या दरम्यान कोचीन येथे होता. याच्या तसेच दुसरा पोर्तुगीज प्रवासी दोमिंगो पेसच्या प्रवास वर्णनातून विजयनगरच्या इतिहासावर प्रकाश पडतो.

**पूर्वमध्ययुगीन मोगल इतिहासकार -** मूलतः मोगल इतिहासाविषयी असलेले परंतु पूर्वमध्ययुगावर प्रकाश टाकणारे ग्रंथ म्हणजे ''तुझुक-इ-बाबुरी'', अबुल फजलचा ''अकबरनामा'', बदायुनीचा ''मन्तखाबुत तवारीख'' निझामुद्दीन अहमदचे ''तबकत-इ-अकबरी'', आणि ''तारीख-इ-फरिश्ता'', अहमद यादगारचे लोदी व सूर घराण्याची माहिती देणारा ''तारीख-इ-शाही'', अब्दुल्लाचा ''तारीख-इ-दाऊदी'', ख्वाजा नियामतुल्ला हारावीचा ''तारीख-इ-खान जहानी'', महंमद मासूमचा ''तारीख-इ-सिंध'' गुलाम हुसेन सलीमचा ''रियाझुस सलातीन'' सिकंदर बिन महंमदचा ''मिरात-इ-सिकंदरी'', रफिउद्दीन शिराझीचा बहामनी राज्य व त्याच्या विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर, गुलबर्गा आणि वऱ्हाड या उपशाखांचा इतिहास सांगणारा ''तझकिरात-उल-मुलुक'' इ. ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

**भारतीय साहित्य -** दिल्लीच्या सुलतानशाहीच्या विकासासोबतच भारतात काही हिंदू राज्येही उदयाला आली. यापैकी काहींनी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व शेवटपर्यंत किंवा दीर्घकाळ कायम राखले. दिल्ली सुलतानशाहीच्या ऱ्हास प्रक्रियेनेही काही हिंदू राज्यांना जन्म दिला. विजयनगरचे साम्राज्य याचे उत्कृष्ट उदाहरण होय. या काळातील हिंदू राज्यांच्या वाटचालीवर प्रकाश टाकणारे बरेच साहित्य पद्य स्वरूपात संस्कृतमध्ये ''राजतरंगिणी'' या समान शीर्षकाखाली लिहिले गेले. राजतरंगिणी या शीर्षकाखाली सर्वप्रथम लिहिणारा भारतीय इतिहासकार पंडित कल्हण होय. या ग्रंथात त्याने प्राचीन काळापासून ते ११४८-४९ पर्यंतच्या काश्मीरच्या इतिहासाचे वर्णन केले आहे. दोन शतकांनंतर जोनाराजाने ११४९ ते १४५९ पर्यंतचा काश्मीरचा इतिहास ''राजतरंगिणी'' याच शीर्षकाखाली लिहिला. सुलतानशाहीच्या काळातील हा काश्मीरचा सर्वात प्राचीन समकालीन इतिहास होय. जोनाराजाचा शिष्य श्रीवरा हा झैनुल अबिदिन व त्याच्या उत्तराधिकाऱ्याचा दरबारी कवी व विद्वान होता. त्याने जैन तरंगिणी या शीर्षकाखाली इ. स. १४५९ ते १४८६ या कालखंडातील काश्मीरचा इतिहास लिहिला. राजतरंगिणी याच शीर्षकाखाली प्रज्याभट्ट आणि शुक यांनी इ. स. १५९६ पर्यंतचा काश्मीरचा इतिहास लिहिला. इ. स. १५८५ मध्ये अकबराने काश्मीर जिंकून मोगल साम्राज्याला

Scanned with CamScanner

जोडले.

राजपुतान्यातील भाटांनी त्यांच्या नायकांच्या रचलेल्या शौर्याच्या व प्रेमाच्या गाथा ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या आहेत. पृथ्वीराज चौहानचा दरबारी भाट चांद बरदाई याने ''पृथ्वीराज रासो'' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात पृथ्वीराज व महंमद घोरीच्या संघर्षाबरोबरच भारतात तुर्की शासनाच्या स्थापनेपूर्वीच्या राजपुतान्यातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि लष्करी घडामोडींची माहिती मिळते.

इ. स. ११९३ ते १२०० या कालखंडात लिहिल्या गेलेल्या जयंकचा ''पृथ्वीराजविजय'' ग्रंथ सपदलाक्श आणि अजमेर येथील चौहान राजघराण्याची विश्वसनीय माहिती देतो.

संस्कृत आणि तेलगू भाषेतील साहित्याचा वापर करून "A Forgotten Empire" या नावाने विजयनगर साम्राज्याचा विस्तृत इतिहास लिहिणारा आर. सेवेल हा पहिला आधुनिक इतिहासकार होय. याच्याच पावलावर पाऊल टेवून एस. के. अय्यंगार आणि के.ए.एन. शास्त्री यांनी विजयनगर साम्राज्याविषयी विस्तृत लिखाण केले.

**पुरातत्वीय साधने** - दिल्लीच्या सुलतानशाहीने नाव घेण्यासारखी पुरातत्त्वीय साधने मागे ठेवली नाहीत. परंतु त्यांची जी नाणी सापडतात त्यावरून सुलतानशाहीचा क्रमबद्ध इतिहास समजण्यास मदत होते.

पूर्वमध्ययुगीन दक्षिण भारतात इस्लामच्या प्रभावक्षेत्राबाहेर जी स्थानिक राज्ये होती त्यांच्या संदर्भात शिलालेख, ताम्रपट, नाणी, स्मारके इ. पुरातत्त्वीय साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहेत. या साधनांमुळे या स्थानिक राज्यांच्या सीमा निश्चित करण्यास मदत होते. सुलतानशाहीतील स्मारकांवरून तत्कालीन सांस्कृतिक प्रवाहाची दिशा समजते. या वास्तू किंवा स्मारके ही हिंदू-मुस्लिम वास्तुकलेचे जिवंत नमुने आहेत. मुस्लिम वास्तुकलेतून तत्कालीन जीवनपद्धती, श्रद्धा व सामाजिक -सांस्कृतिक दृष्टिकोन दिसून येतो. या संदर्भात वा. सी. बेंद्रे, पर्सी ब्राऊन, बर्गीस, फर्ग्युसन, हॅवेल, जॉन मार्शल इ. संशोधकांनी प्रचंड कार्य केले. त्यामुळे पूर्वमध्ययुगीन भारताचा सूत्रबद्ध व क्रमबद्ध इतिहास समजण्यास मदत होते.

**मध्ययुगीन (मोगलकालीन) भारताच्या इतिहासाची साधने -**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची लिखित व पुरातत्त्वीय साधने फार मोठ्या प्रमाणात आणि मूळ स्वरूपात उपलब्ध आहेत. लिखित साधनांत दर्जेदार ऐतिहासिक साहित्य, आत्मचरित्रे, बखरी, प्रवासवर्णने, परकीयांची इतिवृत्ते इ.चा तर पुरातत्त्वीय साधनांत काही आजही दिमाखाने उभ्या असलेल्या तर काही भग्नावस्थेत असलेल्या वास्तू, लेख, नाणी व पुरातन वस्तू यांचा समावेश होतो. या मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या विश्वसनीय साधनांमुळेच आज मध्ययुगीन भारताचा इतिहास एखाद्या भव्य चित्रपटासारखा आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो.



पूर्वमध्ययुगात इस्लामी वारसा घेऊन आलेले भारतीय इतिहासलेखनशास्त्र मध्ययुगात चांगलेच फोफावले व बहरले. मोगल बादशाहीचा संस्थापक बाबर व त्याचे वारस हे शिक्षित व सुसंस्कृत होते. त्यांच्यापैकी सर्वांनाच वाचनाची वा लेखनाची आवड नसली तरी पुस्तकांचा संग्रह करण्यास सर्वच हपापलेले होते. सम्राट अकबराला त्याच्या बालवयात वाचन वा लेखनाची अजिबात आवड नव्हती परंतु त्याच्या मृत्युसमयी (इ. स. १६०५) त्याच्या आग्रा येथील ग्रंथालयात २४,००० पेक्षाही जास्त हस्तलिखिते होती जी प्राचीन व विद्वान लेखकांनी लिहिलेली होती. या सर्व हस्तलिखितांची अत्यंत आकर्षक बांधणी करून ती अनमोल खजिन्याप्रमाणे काळजीपूर्वक जतन करून ठेवण्यात आली होती.

**समकालीन लेखकांचे साहित्य** - मोगल काळात कित्येक दर्जेदार लेखकांनी केलेल्या लिखाणामुळे आपल्या मध्ययुगीन भारताचा इतिहास समजण्यास मदत होते.

**बाबराचे आत्मचरित्र** - भारतातील मोगल बादशाहीचा संस्थापक आणि आशियाच्या इतिहासातील अत्यंत आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या बाबराचे समकालीन लेखकांतील स्थान उच्च दर्जाचे आहे. त्याने त्याच्या छगताई तुर्की या मातृभाषेत आत्मचरित्र लिहिले जे 'तुझुक-इ-बाबुरी', 'वाकियात बाबुरी' किंवा 'बाबरनामा' या नावाने प्रसिद्ध आहे. अकबराच्या काळात या आत्मचरित्राचे प्रथम पेंडाखान व त्यानंतर अब्दुर रहीम मिर्झा यांनी पर्शियन भाषेत भाषांतर केले. आज या ग्रंथाची अनेक युरोपीय व आशियाई भाषांतील भाषांतरे उपलब्ध आहेत. बाबर व त्याच्या काळावर ऐतिहासिक प्रकाश टाकणारे हे प्रथम दर्जाचे साहित्य होय. हे आत्मचरित्र म्हणजे बाबराच्या आयुष्याचा संपूर्ण आराखडा नसून त्यात सलगतेचा अभाव आहे. त्याच्या एकूण ४८ वर्षांच्या आयुष्यापैकी १८ वर्षांच्या कामगिरीचा आलेख या चरित्रात आहे. या चरित्राला प्रस्तावना वगैरे काहीही नसून ते मधूनच म्हणजे बाबराच्या वयाच्या १२ व्या वर्षापासून (फरघनाच्या राज्यप्राप्तीपासून) सुरू होते. यात इ. स. १५०९ ते १५१९ आणि १५२० ते १५२९ या कालखंडातील घडामोडींचा उल्लेख नाही. अकस्मात सुरू झालेले हे आत्मचरित्र ७ सप्टेंबर १५२९ रोजी अचानक संपुष्टात आलेले दिसते. मधला भाग लिहिला असावा व तो गहाळ झाला असावा. या आत्मचरित्राचे फरघना, काबूल आणि हिंदुस्थान असे विषयांवरून तीन प्रादेशिक विभाग पडतात. बाबर हा सुविद्य आणि सुसंस्कृत असल्याने त्याच्या लेखनशैलीत सहजता, साधेपणा आणि विशिष्ट डौल आहे. भाषेचा बडेजाव न मिरविता तो अगदी थोडक्यात व सुस्पष्टपणे सत्य सांगून जातो. गद्यात्मक व पद्यात्मक शैलीतील या आत्मचरित्रात बाबर जितक्या सहजपणे स्वतःच्या विजयांचे व गुणांचे वर्णन करतो तितक्याच सहजपणे पराजयांचे व दुर्गुणांचेही वर्णन करतो. हे आत्मचरित्र इतक्या प्रामाणिकपणे लिहिले गेले आहे की, लेनपूल म्हणतो त्याप्रमाणे यातील घटनांची शहानिशा करण्यासाठी इतर कोणत्याही साक्षीपुराव्याची गरज नाही.

Scanned with CamScanner

**मिर्झा हैदरचा तारीख-इ-रशिदी** - भारतातील मोगली शक्तीच्या उदयाबाबत विस्तृत माहिती देणारा मिर्झा हैदर दुघलतचा हा ग्रंथ बाबरनामानंतर दुसरा महत्त्वाचा ग्रंथ आहे. हुमायूनच्या काळात मोगली साम्राज्याला जे अल्पकाळ ग्रहण लागले त्याबाबतही हा ग्रंथ माहिती देतो. इ. स. १४९९ मध्ये जन्मलेला मिर्झा हैदर हा बाबरचा चुलत भाऊ होता. या ग्रंथात मोगलीस्तानचे खान आणि काशगरचे अमीर यांचा तैमूरलंगपासून ते इ. स. १५४१ पर्यंतचा इतिहास दिला आहे. पर्शियन भाषेतील या ग्रंथाचे दोन भाग असून पहिल्या भागात मोगलांचा क्रमबद्ध इतिहास तर दुसऱ्या भागात लेखकाच्या आठवणी दिल्या आहेत. या आठवणींमुळे बाबरच्या आत्मचरित्रातील जो भाग गहाळ झाला है तो समजण्यास मदत होते.

**गुलबदन बेगमचा हुमायूननामा** - या ग्रंथाची लेखिका गुलबदन बेगम ही बाबरची मुलगी आणि हुमायूनची सावत्र बहीण होती. वडिलांच्या मृत्युसमयी ती ८ वर्षांची होती. पुढे तिचा सांभाळ हुमायूनने केला. ती एक सुविद्य आणि सुसंस्कृत स्त्री असून वयाच्या १७ व्या वर्षी तिचा विवाह काबूलस्थित एका छगताई तुर्क सरदाराशी करून देण्यात आला. इ. स. १५५७ मध्ये अकबराने तिला आग्र्याला बोलाविले. तिथेच ती इ. स. १६०५ मध्ये मृत्यू पावली. अकबराच्या विनंतीवरूनच तिने पर्शियन व तुर्की अशा मिश्र भाषेत 'हुमायूननामा' लिहिला. साहित्यिक व ऐतिहासिकदृष्ट्या या ग्रंथाचे स्थान गौण असले तरी बाबर व हुमायून काळातील अनेक घटनांची ती प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याने (विशेषतः हुमायून व त्याचा भाऊ कामरान यांच्यातील संघर्ष) या ग्रंथाची तत्कालीन राजकीय घडामोडी समजण्यास मदत होते.

**खोण्डामीरचा कानून-इ-हुमायुनी** - खोण्डामीरने खुलासत-उल्-अखबार ग्रंथात मोगलांच्या इ. स. १५२८ पर्यंतच्या इतिहासाचा आढावा घेतला. कानून-इ-हुमायुनी ग्रंथात हुमायूनच्या प्रशासकीय कामगिरीची माहिती देण्यात आली आहे.

**जौहर आफताबची तारीख-इ-हुमायुनी** - जौहरच्या ग्रंथात हुमायूनच्या जीवनातील काही महत्त्वाच्या घटनांची चर्चा करण्यात आली आहे. ज्यामुळे हुमायूनच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंचे ज्ञान होते. जौहरने अकबराच्या बालपणाविषयी लिहिले आहे. जौहर हा हुमायूनचा २५ वर्षे खाजगीकडील चाकर होता. इ. स. १५८७ मध्ये त्याने अकबराच्या सांगण्यावरून स्वतःच्या आठवणी लिहून काढल्या ज्यांचा अबुल फझलला 'अकबरनामा' लिहिताना फार उपयोग झाला. या ग्रंथाचे साहित्यिक व ऐतिहासिक मोल नगण्य असले तरी त्याची हुमायूनविषयीची जी माहिती आहे ती केवळ एक निष्ठावान व प्रामाणिक चाकरच लिहू शकतो. शिवाय तो त्याच आठवणी लिहितो ज्यांचा तो साक्षीदार होता.

**अफगाण शासकांच्या बखरी व बखरकार -**

इ. स. १५४० ते १५५५ या १५ वर्षांत दिल्ली येथे अफगाण शासकांची



सत्ता होती. बखरकारांकडून त्यांचा इतिहास समजण्यास मदत होते.

**अब्बासखान सरवानी, तारीख-इ-शेरशाही** - अब्बासखान हा अल्प काळासाठी अकबराच्या दरबारातील ५०० स्वारांचा मनसबदार होता. तो अफगाणवंशीय व साहित्याची आवड असणारा असल्याने त्याने इ. स. १५७९ नंतर सर्वश्रेष्ठ अफगाण शासक शेरशहा सूरविषयी 'तारीख-इ-शेरशाही' ग्रंथात लिहिले. वास्तविक हा ग्रंथ म्हणजे लेखकाचे आत्मचरित्र असून यातील पात्रे स्वतःशीच संवाद करतात. या पात्रांच्या तोंडी घालण्यात आलेल्या वाक्यांत सत्यता किती आहे हा संशोधनाचा विषय असला तरी या ग्रंथातून त्याने जो शेरशहा उभा केला त्यामुळे शेरशहा मध्ययुगीन भारताच्या इतिहासात अमर झाला. या ग्रंथाचे तीन भाग असून पहिल्या भागात शेरशहाचा उदय व त्याच्या सुधारणा, दुसऱ्या भागात इस्लामशहाचा इतिहास तर तिसऱ्या भागात इस्लामशहाच्या वारसांनी घातलेला गोंधळ व त्यामुळे हुमायूनच्या राज्यशकटाचा मोकळा झालेला मार्ग याचे वर्णन आहे.

**अहमद यादगार, तारीख-इ-सलातीन-इ-अफगाण** - भारतातील शेवटचा अफगाण शासक दाऊदशहा याच्या सांगण्यावरून यादगारने या ग्रंथनिर्मितीला सुरुवात केली. पुढे अकबराच्या मार्गदर्शनाखाली इ. स. १६०१ मध्ये हा ग्रंथ पूर्ण झाला. भारतात अफगाणांची सत्ता नव्याने स्थापन करण्यासाठी अफगाणांनी बाबर व हुमायून यांच्याशी केलेल्या संघर्षाचे यात वर्णन आहे.

**अब्दुल्ला तारीख-इ-दाऊदी** - जहांगीरच्या काळात लिहिल्या गेलेल्या या ग्रंथात अब्दुल्लाने सूर व लोदी घराण्याचा इतिहास वर्णन केला आहे.

**नियामतुल्ला तारीख-इ-खानजहानी** - जहांगीर बादशहाच्या दरबारी इतिहासकार (वाकयानवीस) असलेल्या नियामतुल्लाने इ. स. १६१३ मध्ये हा ग्रंथ पूर्ण केला. यात प्रामुख्याने लोदी व सूर घराण्याच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**अकबर आणि समकालीन इतिहासकार -**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ सम्राट असलेल्या अकबराचे त्याच्या समकालीन इतिहासकारांनी वेगवेगळ्या पद्धतीने मूल्यमापन केले आहे. अबुल फझल हा अकबराचा दरबारी लेखक अकबराची वारेमाप स्तुती करतो. बदायुनी हा अकबराचा विरोधक असून अकबराचे ढोंगी व इस्लामचा शत्रू म्हणून वर्णन करतो. तर निझामुद्दीन अहमद हा जास्त तटस्थपणे अकबराच्या कामगिरीचे मूल्यमापन करतो.

**अबुल फझल-अकबरनामा** - मोगल काळातील सर्वश्रेष्ठ इतिहासकार अबुल फझलचा जन्म इ. स. १५५१ मध्ये आग्रा येथे झाला. शियापंथीय अबुल फझलचा इ. स. १५७४ मध्ये अकबराशी परिचय झाला व अबुल फझलच्या जीवनाला एक नवीन वळण लागले. सुरुवातील २० स्वारांचा मनसबदार असलेला अबुल फझल हा १६०२ च्या सुमारास पंचहजारी मनसबदाराच्या पदापर्यंत पोहोचला होता. अबुल

फझलचा अकबरावर दाट प्रभाव असून तो अकबराचा सच्चा मित्र व मार्गदर्शक होता. अकबराच्या सांगण्यावरून त्याने अकबरकालीन मोगल साम्राज्याचा इतिहास लिहिण्यास इ. स. १५८९ मध्ये सुरुवात केली. ऐतिहासिक साधन सामुग्रीचा महासागर उपसून त्याने इ. स. १६०२ पर्यंतच्या अकबराच्या काळाचा सर्वांगीण आढावा घेतला. याच वर्षी त्याचा मृत्यू झाला.

ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत मौलिक असलेल्या 'अकबरनामा' ग्रंथाचे तीन भाग आहेत. पहिल्या भागात अकबराचे वंशज बाबर व हुमायूनच्या काळाचा आढावा घेण्यात आला आहे. दुसऱ्या भागात अकबराच्या समग्र कारकीर्दीचा अत्यंत विस्तृत परिचय तर तिसऱ्या भागाला 'ऐने-अकबरी' उपशीर्षक देऊन एक स्वतंत्र ग्रंथच लिहिण्यात आला. कौटिल्याच्या अर्थशास्त्रानंतर ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असलेला ऐने-अकबरी ग्रंथ होय. अकबराच्या इतिहासाचे सविस्तर वर्णन करताना अबुल फझलची ऐतिहासिक लेखनातील शिस्त, निधर्मी दृष्टिकोन आणि प्रखर बुद्धिमत्ता यांचे पानोपानी दर्शन होते. त्याच्या मते मध्ययुगीन हिंदुस्थानचा इतिहास हा हिंदू-मुस्लिम संघर्षाचा इतिहास नसून राष्ट्रीयता विरुद्ध प्रादेशिकता, निधर्मी दृष्टिकोन विरुद्ध धार्मिक कट्टरता आणि स्थैर्य विरुद्ध अस्थिरता यांच्या संघर्षाचा इतिहास होय. अबुल फझलने स्वतः लिहिलेली तसेच संपादित केलेली दरबारी पत्रे मोगलांचा इतिहास समजावून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी आहेत. अकबरनामाच्या रूपाने अबुल फझलने पर्शियन भाषेत एक गद्यशैली निर्माण केली.

**बदायुनी : मंतखाव-उत्-तवारीख** - टोडा येथे इ. स. १५४१ मध्ये जन्मलेला बदायुनी हा पर्शियन, अरबी आणि संस्कृत भाषेचा महापंडित होता. इस्लामी तत्त्वज्ञान, खगोलविद्या आणि इतिहास यांचा तो गाढा अभ्यासक होता. तो अकबराच्या दरबारातील इमाम असून अकबराने त्याच्याकडून अरबी व संस्कृत भाषेतील काही ग्रंथांचे पर्शियन भाषेत भाषांतर करवून घेतले. अकबराच्या दरबारात असताना त्याने रामायणाचेही पर्शियन भाषेत भाषांतर केले परंतु त्याचे महाभारताच्या भाषांतराचे काम अर्धवटच राहिले. याच सुमारास अबुल फझल व अबुल फैजीचा अकबराच्या दरबारात प्रवेश झाल्याने बदायुनीच्या स्थानाला ओहोटी लागली. बदायुनी हा दोघा भावांचा कट्टर विरोधक होता. तो त्यांची निलाजरे, भाट, कपटी आणि अकबराचे हेयवा म्हणून निर्भर्त्सना करतो. तो कट्टर सुन्नी असल्याने त्याला अकबराचा निधर्मी व उदारमतवादी दृष्टिकोन म्हणजे ढोंग वाटे. त्याने दरबारात जाणे बंद केले त्यामुळे त्याचा राजाश्रयही तुटला. इ. स. १५९६ मध्ये तो कंगाल अवस्थेत मृत्यू पावला.

बदायुनीच्या मंतखब-उत्-तवारीख ग्रंथात गझनीच्या शासकांपासून ते अकबराच्या ४० व्या वर्षाच्या राजकीय कारकीर्दीपर्यंतचा आढावा घेण्यात आला आहे. बदायुनीच्या ग्रंथाचे दोन भाग असून पहिल्या भागात सबक्तगिन ते हुमायूनपर्यंतचा भारतातील इस्लामी



राजवटीचा इतिहास देण्यात आला आहे. दुसऱ्या भागात अकबराच्या कारकीर्दीचे विस्तृत विवेचन तसेच त्याच्या दरबारातील ३८ शेख (धार्मिक नेते), ६९ विद्वान, १५ तत्त्वज्ञ, धन्वंतरी आणि १६७ कवींची माहिती देण्यात आली आहे. बदायुनी हा इतिहासकार नसल्याने त्याच्या ग्रंथात ऐतिहासिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. तो अकबर व त्याच्या कृपापात्रांवर सडकून टीका करतो. तो कोणाचाही मिंधा नसल्याने त्याला जे जाणवले ते त्याने कुणाच्याही रागालोभाची पर्वा न करता प्रामाणिकपणे लिहिले. अबुल फझल हा अकबराचा स्तुतिपाठक होता परंतु बदायुनी टीकाकार असल्याने त्याच्या ग्रंथामुळे अकबराचे व्यक्तिमत्त्व अधिकच खुलून जगापुढे येते.

**ख्वाजा निझामुद्दीन अहमद : तबाकत-इ-अकबरी** - तबाकत-इ-अकबरी हा मध्ययुगीन भारताच्या इतिहासावरील अत्यंत विश्वसनीय ग्रंथ मानला जातो. इ. स. १५९३ मध्ये पूर्ण झालेल्या ग्रंथात संपूर्ण हिंदुस्थान डोळ्यासमोर ठेवून इतिहासाचा आढावा घेण्यात आला आहे. अकबराच्या दरबारात मीरबक्शी पदावर काम करणाऱ्या निझामुद्दीनच्या ग्रंथाचे तीन भाग पडतात. पहिल्या भागात गझनी व घोरी शासकांच्या उत्तर हिंदुस्थान विजयाचे वर्णन व दिल्लीच्या सुलतानशाहीच्या इतिहासाचा उल्लेख येतो. दुसऱ्या भागात बाबर ते अकबराच्या ३९ व्या राज्यारोहणापर्यंतचा कालखंड तर तिसऱ्या भागात हिंदुस्थानातील स्थानिक व प्रांतीय राज्यांचा इतिहास सांगण्यात आला आहे. त्याच्या कथनानुसार मोगली साम्राज्यात ३२०० नगरे होती पैकी १२० मोठी शहरे होती.

**अकबराच्या काळातील इतर इतिहासकार** - महंमद अरिफ कंदाहारीच्या तारीख-इ-अकबरशाही ग्रंथात गझनीचे शासक ते १५७९ पर्यंतच्या भारतातील इस्लामच्या राजवटीचा इतिहास समजण्यास मदत होते. महंमद अरिफ अकबराच्या प्रशासकीय सेवेत होता. त्याने अकबराच्या राजकीय धोरणाचे अत्यंत तटस्थपणे वर्णन केले आहे.

अबुल फझलच्या मृत्यूनंतर इनायतुल्ला अकबराचा दरबारी इतिहासकार म्हणून नियुक्त झाला. त्याने इ. स. १६०२ ते ऑक्टोबर १६०५ (अकबराचा मृत्यू) पर्यंतच्या इतिहासाचा आढावा घेतला परंतु त्यात अनेक महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख नाही. साहित्यिक व ऐतिहासिकदृष्ट्या याचे लिखाण दुय्यम दर्जाचे आहे.

इ. स. १६१२ मध्ये पूर्ण झालेला 'तारीख-इ-फरिश्ता' हा फरिश्ताचा ग्रंथ मध्ययुगीन भारताच्या इतिहासावरील समकालीन लेखकांच्या ग्रंथांपैकी सर्वात लोकप्रिय ग्रंथ होय. यात जहांगीरच्या राज्यारोहणापर्यंतच्या इस्लामी राजवटीचा सर्वसाधारण इतिहास वर्णन करण्यात आला आहे. मोगल व बहामनी राज्यांचे संबंध हा त्याच्या ग्रंथातील महत्त्वपूर्ण भाग होय.

बयाझिद बियाद हा मोगल सरदार ५० वर्षे हुमायून व अकबराच्या चाकरीत

Scanned with CamScanner

होता. त्याने 'तझकिरा-इ-हुमायून वा अकबर' ग्रंथ लिहिला. यात इ. स. १५४२ ते १५९१ या कालखंडातील हुमायून व अकबराच्या कारकीर्दीतील प्रशासकीय घडामोडींची त्रोटक माहिती मिळते.

'तारीख-इ-खानदान-इ-तैमुरिया' या ग्रंथाच्या लेखकाचे नाव अज्ञात आहे. यात अकबराच्या २२व्या राज्यारोहणापर्यंतच्या इतिहासाची माहिती मिळते.

इ. स. १५९६-९७ च्या सुमारास अब्दुल हक दहलवीने 'तारीख-इ-हक्की' ग्रंथ लिहिला. यात अकबराच्या धार्मिक धोरणावर सडकून टीका करण्यात आली आहे.

अकबराच्या उत्तर काळात लिहिण्यात आलेल्या याह्या बिन अब्दुल लतीफच्या 'मंतखाब-उत्-तवारीख' ग्रंथात मोगलांच्या भारतातील कामगिरीचा आढावा घेण्यात आला आहे.

अकबराच्या अशिरगड वेढ्याचे व विजयाचे वर्णन करणारा शेख इलाहाबाद फैजी सरहिंदीचा 'अकबरनामा' ग्रंथ अकबराच्या लष्करी मोहिमेवर प्रकाश टाकतो.

मोलाना अहमदच्या 'तारीख-इ-अलफी' ग्रंथात इ. स. ६२२ ते १५९२ या कालखंडातील इस्लामच्या प्रसाराचा तपशील देण्यात आला आहे.

अकबराच्या मृत्यूनंतर मोहसीन फानीने 'दबिस्तान-इ-मझहिब' ग्रंथ लिहिला. यात अकबराने फत्तेपूर शिक्री येथील इबादतखान्यात ज्या निरनिराळ्या धर्मांच्या पंडितांशी धर्मविषयक चर्चा केली त्याचा गोषवारा तसेच दीने-इलाहीच्या मूलतत्त्वांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

**जहांगीरच्या काळातील इतिहासकार -**

**तुझुक-इ-जहांगिरी** - बाबराच्या पावलावर पाऊल ठेवून जहांगीरने स्वतःचे आत्मचरित्र लिहिले. सुरुवातीच्या १२ वर्षांच्या आठवणी जहांगीरने स्वहस्ते लिहिल्या व पुढील लिखाण मोतमादखानकडे सोपविले. त्याने हे लिखाण जहांगीरच्या १९ व्या राज्यारोहण काळापर्यंत लिहिले. जहांगीरच्या कारकीर्दीचा समग्र आढावा घेणाऱ्या या ग्रंथात जहांगीरच्या सुरुवातीच्या १८ वर्षांच्या कारकीर्दीतील सामाजिक व सांस्कृतिक घडामोडींची चर्चा तसेच युद्धे, बंडे, विजय, नेमणुका, पदोन्नती, पदच्युती इ. प्रसंगांचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. यात साम्राज्याची भौतिक प्रगती, प्रासंगिक दुष्काळ व साथीच्या रोगांचाही उल्लेख आहे. जहांगीरनें कित्येक ठिकाणी स्वतःच्या खाजगी आयुष्यातील घटनांचीही मोकळी चर्चा केली आहे. तरीही हे आत्मचरित्र बाबराच्या आत्मचरित्राच्या जवळपासही फिरकू शकत नाही. स्वतःला बाबर व अकबर या महान राज्यकर्त्यांचा योग्य वारस सिद्ध करण्याच्या नादापायी तो स्वतःच्या प्रत्येक राजकीय कृत्याचे समर्थन करण्याच्या भरीस पडतो. असे असूनही जहांगीरचा इतिहास जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो.

**मोतमादखान : इक्बालनामा** - मोतमादखानने जहांगीरला त्याचे आत्मचरित्र



लिहिण्यास मदत केली होती. तो जहांगीरचा मीरबक्शी असून राजपुत्र खुर्रमच्या बंडाचा तो एक साक्षीदार होता. महाबतखानने जेव्हा जहांगीर व नूरजहानच्या छावणीवर हल्ला करून कैद केले त्या वेळी मोतमादखान छावणीत हजर होता. त्याने सर्व मुत्सद्देगिरी पणाला लावून शाही जोडप्याची सुटका केली. त्याचा 'इक्बालनामा' ग्रंथ शहाजहान काळात पूर्ण झाला. ज्यात मोगलांचा सर्वसाधारण इतिहास वर्णन करण्यात आला आहे. यात जहांगीरच्या शेवटच्या काळातील घटनांचा विशेषतः शहाजहानच्या सिंहासनाच्या दिशेने वाटचालीचा महत्त्वाचा भाग वर्णन करण्यात आला आहे. मोतमादखान जहांगीरच्या दुर्दैवासाठी तसेच राजपुत्र खुर्रमच्या बापाविरुद्धच्या कारवायांसाठी नूरजहानला जबाबदार धरतो. अर्थात त्याच्या लिखाणात प्रामाणिकतेचा अभाव असून तो राजपुत्र खुर्रमचा पक्ष उचलून धरतो.

**इतर इतिहासकार** - महंमद हादीचा तातिम्मा-वाकियात-इ-जहांगिरी, ख्वाजा कामगाराचा ''मासीर-इ-जहांगिरी'', अज्ञात लेखकाचा इंतिखाब-इ-जहांगिरीशाही इ. ग्रंथ जहांगीरचा इतिहास जाणून घेण्यास मोलाची मदत करतात.

**शहाजहानच्या काळातील इतिहासकार -**

शहाजहानच्या काळात मोगली सत्तेचे वैभव कळसाला पोहोचले होते. या काळात प्रचंड साहित्य निर्माण झाले. शहाजहान काळातील दरबारी व गैरसरकारी इतिहासकारांनी शहाजहानच्या कारकीर्दीवर विस्तृत लिखाण केले ते सर्व ''पादशहानामा'' या लोकप्रिय नावाने ओळखले जाते. सर्वात पहिला ''पादशहानामा'' महंमद अमिन काझविनीने लिहिला. तो शहाजहानचा दरबारी इतिहासकार होता. अबुल फझलच्या पावलावर पाऊल ठेवून त्याने शहाजहानच्या सुरुवातीच्या १० वर्षांच्या कारकीर्दीवर सविस्तर लिखाण केले. यात शहाजहानचे बालपण व त्याच्या शिक्षणाविषयी महत्त्वाची माहिती मिळते.

अब्दुल हमीद लाहोरी हा शहाजहानकाळातील सर्वात श्रेष्ठ इतिहासकार. अबुल फझलच्या अकबरनामाप्रमाणे अब्दुल लाहोरीचा पादशहानामाही शहाजहानकालीन सर्वोत्कृष्ट ऐतिहासिक ग्रंथ मानला जातो.

इनायतखानचा ''शहाजहाननामा'' ग्रंथ म्हणजे तत्कालीन दरबारी चरित्रकारांनी लिहिलेल्या चरित्रांतील काही नोंदींचे संकलन आहे.

महंमद सलीह हा सरकारी कागदपत्रे नोंदखात्यात अधिकारी होता. त्याने ''अमल-इ-सलीह'' ग्रंथ लिहिला. यात शहाजहानचा वारसाहक्काच्या युद्धापर्यंतचा इतिहास दिला आहे. शिवाय या ग्रंथात शहाजहान काळातील धार्मिक व्यक्ती, संत, विद्वान, कवी, कलावंत यांचीही थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. या ग्रंथात राजपुत्र, उच्च मुलकी व लष्करी अधिकारी, दरबारी इ. ची त्यांच्या दर्जानुसार यादीही देण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

महंमद सादिकखानचा ''शहाजहाननामा'' हा पादशहानामानंतर दुसऱ्या क्रमाचा ऐतिहासिक ग्रंथ मानला जातो. यात जहांगीरच्या मृत्यूपासून ते औरंगजेबच्या राज्यारोहणापर्यंतच्या घटनांचा क्रमबद्ध उल्लेख आहे. सादिकखान या ग्रंथात शहाजहानच्या चुकांचा निर्भीडपणे उल्लेख करतो. तसेच त्याच्या हिंदू अधिकाऱ्यांच्या योगदानाचे कौतुकही करतो. शहाजहानकडून अन्याय झालेल्या अधिकाऱ्यांविषयी त्याला सहानुभूती वाटते. तसेच दाक्षिणात्यांनी ज्या शौर्याने शहाजहानचा प्रतिकार केला त्याचे कौतुक वाटते. शहाजहानच्या फसलेल्या कंदाहार धोरणाची मीमांसा करताना तो मोगलांचा निकृष्ट दर्जाचा तोफखाना व दोषपूर्ण सैन्यरचनेला जबाबदार धरतो. वारसाहक्काच्या युद्धात झालेल्या दाराच्या पराभवानंतर सादिकने शहाजहान व औरंगजेबादरम्यान झालेल्या वाटाघाटीत भाग घेतला असल्याने त्याचे वारसाहक्काच्या युद्धासंबंधीचे लिखाण अत्यंत विश्वसनीय समजले जाते.

**औरंगजेबकालीन इतिहासकार -**

औरंगजेबाची ५० वर्षांची कारकीर्द ही परिणामांच्या दृष्टीने मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील अत्यंत गुंतागुंतीची कारकीर्द होय. औरंगजेबाच्या कारकीर्दीतील एकमेव दरबारी इतिहासकार म्हणजे ''आलमगीरनामा''चा लेखक मिर्झा महंमद काझीम. हा ग्रंथ औरंगजेबाचा स्तुतीग्रंथ असून त्याला कमीपणा आणणाऱ्या घटनांना ग्रंथात स्थान नाही. ग्रंथात औरंजेबाच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या दशकाचा आढावा घेण्यात आला आहे. यानंतर ग्रंथाचे लिखाण थांबविण्यात आले. कारकीर्दीच्या २१ व्या वर्षी औरंगजेबाने संपूर्ण साम्राज्यात समकालीन इतिहासलेखनावर बंदी आणली.

महंमद हाशिम ऊर्फ खफीखान हा उच्च दर्जाचा इतिहासकार होता. औरंगजेबाने इतिहासलेखनावर बंदी आणल्यानंतरही त्याने गुप्तपणे लिखाण सुरू ठेवून ''मंतखाब-उल्-लुबाब'' या शीर्षकाखाली बाबर ते महंमदशहा (इ. स. १७३३) पर्यंतचा मोगलांचा इतिहास लिहिला. यात मोगलांच्या दक्षिण भारत धोरणावर विशेष भर देण्यात आला आहे.

औरंगजेबच्या मृत्यूनंतर महंमद साकी मुस्तैदखानने ''मासिर-इ-आलमगिरी'' ग्रंथ लिहिला. ५४१ पृष्ठांच्या या ग्रंथात सरकारी कागदपत्रांच्या साहाय्याने औरंगजेबच्या ५१ वर्षांच्या कारकीर्दीचा आढावा घेण्यात आला आहे.

अकिलखान रझवी हा औरंगजेबाचा अधिकारी होता त्याने ''जाफरनामा-इ-आलमगिरी'' या ग्रंथात औरंगजेबाच्या विजापूरवरील स्वारीपासून (इ. स. १६५०) ते मीर जुम्लाचा मृत्यू (इ. स. १६६३) पर्यंतच्या घटनांचे वर्णन करण्यात आले आहे.

मीर महंमद मासूमचा ''तारीख-इ-शाहसुजाई'' ग्रंथ हा शहाजहानपुत्र शहाशुजाची माहिती देणारा एकमेव विश्वसनीय ग्रंथ आहे.

भीमसेनच्या ''नस्ख-इ-दिलकुशा'' ग्रंथात औरंगजेबच्या हैदराबादवरील स्वारीपासून (इ.. स. १६५६) ते इ. स. १७०९ पर्यंतचा इतिहास देण्यात आला आहे.

इसार दासने ''फुतुहाती-इ-आलमगिरी'' ग्रंथात इ. स. १६५७ ते १६९८ या कालखंडातील औरंगजेबच्या राजपुताना व माळवा प्रांतांतील राजकीय हालचालींची माहिती दिली आहे.



''तारीख-इ-इरादतखान'' ग्रंथात औरंगजेबाच्या मृत्यूपासून ते बादशहा फर्रूकसियर पर्यंतच्या मोगलांच्या इतिहासाचे वर्णन करण्यात आले आहे. याशिवाय महंमद कासीमचा ''इब्रतनामा'', महंमद हादीचा ''तारीख-इ-छगताई'' इ. ग्रंथ मोगलांचा इतिहास जाणून घेण्यासाठी उपयुक्त ठरतात.

**संस्कृत, हिंदी व प्रादेशिक भाषेतील साहित्य -**

बाबर व हुमायूनला संस्कृत व इतर भारतीय भाषांमध्ये रूची नव्हती. भारतीय भाषांत रस घेणारा अकबर हा पहिला मोगल शासक होय. त्याने या भाषांना प्रोत्साहन दिले तसेच मुस्लिम विद्वानांना संस्कृत व हिंदी भाषेचा अभ्यास करण्यास प्रेरित केले. अकबराच्या काळात पहिला पर्शियन-संस्कृत शब्दकोश ''फार्सीप्रकाश'' लिहिला गेला. अकबराप्रमाणेच जहांगीर व शहाजहाननेही भारतीय भाषांना प्रोत्साहन दिल्याने या काळात विपुल ग्रंथनिर्मिती झाली परंतु धर्मवेड्या औरंगजेबाने भारतीय भाषांना देण्यात आलेला राजकीय आश्रय काढून घेताच या भाषेच्या विद्वानांना प्रचंड धक्का बसला. तरीही भारतीय भाषांत प्रांतीय सरकारात व रजपूत राज्यात भरपूर लिखाण झाले. परंतु हे सर्व लिखाण पर्शियन साहित्य डोळ्यापुढे ठेवून करण्यात आले असल्याने ऐतिहासिकदृष्ट्या ते दुय्यम दर्जाचे आहे. भारतीय भाषांतील लिखाणात मूलभूत संशोधनाचा अभाव आहे. या ठिकाणी संस्कृत व हिंदी भाषेतील काही महत्त्वाच्या ग्रंथांचा विचार उपयुक्त ठरेल.

अकबराच्या काळात महेश ठाकूरने ''सर्वदेशवृत्तांत संग्रह'' ग्रंथ लिहिला. यात अकबराच्या काळातील राजकीय किंवा लष्करी घटनांचा उल्लेख नाही कारण ज्या पर्शियन ग्रंथावरून हे लिखाण करण्यात आले त्यातही वरील संदर्भ नाही.

पद्म सुंदरच्या ''अक्षरशाही शृंगार दर्पण'' ग्रंथात अकबराच्या काळातील सामाजिक व सांस्कृतिक बाबींची चर्चा करण्यात आली आहे.

रणछोड भट्टने ''अमरकाव्य वंशावली'' हा काव्यग्रंथ लिहिला (इ. स. १६६५). यात मेवाडचा राणा राजसिंहच्या राज्यभिषेकापर्यंतचा मेवाडचा इतिहास देण्यात आला आहे. रणछोड भट्टने ''राजप्रशस्ती'' नावाचे संस्कृत महाकाव्य २५ शिलांवर लिहिले आहे. राणा राजसिंहाच्या राजसमुद्र तळ्याजवळ हे महाकाव्य कोरलेले आहे. सिसोदिया घराण्याच्या बाप्पा रावळपासूनचा मेवाडचा इतिहास यात कोरण्यात आला आहे.

महाकवी चंद्रशेखरने ''सुरजनचरित महाकाव्य'' लिहिले. यात रणथंबोरच्या राय सुरजनच्या लष्करी मोहिमांचा उल्लेख करण्यात आला आहे.

अकबराच्या काळातील काही जैन साधूंनी संस्कृतमध्ये रचना केली. ज्यात अकबराच्या धार्मिक धोरणाची व विशेषतः त्याच्या जैन साधूंशी असलेल्या संबंधांची चर्चा करण्यात आली आहे. यात सिद्धीचंद्र उपाध्यायचा ''भानुचंद्र चरित्र'', शांतीचंद्रचा ''कृपीरसकोश''

Scanned with CamScanner

आणि जयसोम उपाध्यायचा "कर्मचंद वंशप्रबंध" इ. ग्रंथ विशेष महत्त्वाचे आहेत.

हिंदी भाषेत तुरळक ग्रंथरचना झाली. राजस्थानी बोलीभाषेत मोगलांच्या हिंदू सरदारांच्या इतिहासावर काही प्रमाणात लिहिले गेले. यापैकी बिकानेरच्या दलपतसिंगवरील "दलपत विलास" राजस्थानच्या १५ व्या व १६ व्या शतकातील इतिहासावर प्रकाश टाकणारा मेहता नयनसीचा "नयनसी ख्यात", ओर्छा नरेश वीरसिंह बुंदेला वरील केशवदासाचे "वीरसिंहदेव चरित्र" तसेच याच लेखकाचे जहांगीर चंद्रिका इ. ग्रंथ महत्त्वाचे आहेत. या काळात भक्तीचळवळ बरीच फोफावली. त्यामुळे हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती इ. प्रादेशिक भाषांत मोठ्या प्रमाणात धार्मिक साहित्य निर्माण झाले. त्यावरून तत्कालीन भारताची धार्मिक स्थिती समजण्यास मदत होते.

ग्रँट डफने "मराठ्यांचा इतिहास" लिहिला. शिवाय जेधे शकावली व बखर वाङ्मय मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकते.

**परकीयांचे इतिवृत्त -**

मध्ययुगीन भारतात युरोपातून व्यापारी, प्रवासी आणि ख्रिश्चन धर्मप्रसारक मोठ्या प्रमाणात आले. त्यांच्या लिखाणाचा उपयोग मध्ययुगीन भारताचा इतिहास समजण्यास मोठ्या प्रमाणात होतो.

मोगल काळात रिचर्ड हकल्युट, विल्यम हॉकिन्स, सर टॉमस रो, सर जेम्स लँकेस्टर, विल्यम हेजेस, पीटर मंडी, जॉन जॉर्डेन, पिएट्रो डेला व्हॅले इ. प्रमुख प्रवासी येऊन गेले.

फादर मॉन्सरेट, फादर जेरोमी झेव्हियर, फादर इमॅन्युअल, पिन्हेरो, फादर थॉमस स्टिव्हन्स इ. ख्रिश्चन धर्मप्रसारक येऊन गेले.

राल्फ फिच, पॉल कॅनिंग, विल्यम एडवर्ड इ. व्यापारी भारतात आले. त्यांनी भारताविषयी ज्या नोंदी केल्या त्यामुळे आणि विशेषतः बर्नियर, टॅव्हरनियर, मनुची यांच्या रोजनिशींवरून भारताचा इतिहास समजण्यास मदत होते.

**पुरातत्त्वीय साधने -**

आलेख, नाणी, वास्तू, पुरातन वस्तू यामुळे मध्ययुगीन भारताचा सामाजिक-सांस्कृतिक इतिहास समजण्यास मदत होते. या साहित्याचा मोगलांच्या राजकीय इतिहासाच्या लेखनास विशेष उपयोग होत नाही. मध्ययुगीन भारताचा इतिहास लिहिणाऱ्या आधुनिक इतिहासकारांत एडवर्ड टॉमस हा पहिला इतिहासकार आहे की ज्याने मध्ययुगीन नाण्यांचा पुरेपूर वापर करून "The chronicles of the Pathan Kings of Delhi" ग्रंथ लिहिला. वा. सी. बेंद्रे यांनी "A study of Muslim Inscriptions" हा ग्रंथ लिहिला. यात मध्ययुगीन भारतातील उपलब्ध आलेख, शिलालेख, ताम्रपट यांची टीपणासह क्रमबद्ध माहिती देण्यात आली आहे. जॉन मार्शल, पर्सी ब्राऊन, बर्जीस, फर्ग्युसन, हॅवेल, कोसेन इ. विद्वानांनी कला व वास्तुकलेच्या क्षेत्रात विपुल संशोधन करून तत्कालीन



सांस्कृतिक प्रवाहावर प्रकाश टाकला आहे. या सर्व साहित्यामुळेच अभ्यासकाला मध्ययुगीन भारताचा सुसंगत आणि क्रमबद्ध इतिहास उपलब्ध झाला आहे.

**प्रश्नसंग्रह**

१) पूर्वमध्ययुगीन भारताच्या किंवा सुलतानशाहीच्या इतिहासाच्या साधनांचा आढावा घ्या.

२) मध्ययुगीन किंवा मोगलकालीन भारताच्या इतिहासाच्या साधनांची सविस्तर चर्चा करा.

३) टिपा द्या.

अ) अमीर खुस्रो

ब) अकबरकालीन इतिहासकार

क) मोगलकालीन परकीय प्रवाशांची वर्णने

ड) भारतीय भाषांतील साधने

इ) पुरातत्वीय साधने.

---

Scanned with CamScanner